महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ६९ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१९८० : रशियन साहित्यिक आंतोन चेक्कॉव्ह यांचा जन्म झाला.
१७०६ : बेंजामिन फ्रँकलिन यांचा जन्म.
१७७१ : पेशव्यांचे सरदार गोपाळराव पटवर्धन यांचे निधन.
१९०६ : कुटुंब नियोजनाच्या कार्यकर्त्या शकुंतला परांजपे यांचा जन्म झाला.

सेन्सेक्स ८३,५७०.३५ +१८७.६४ (०.२३%)
डॉलर ₹ ९०.७४

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३२ | १५ |
| दिल्ली | २१ | ०८ |
| मुंबई | ३१ | १९ |
| नागपूर | ३० | ११ |
| पुणे | ३१ | ११ |

**सुविचार**

शुभ सकाळ! चांगल्या दिवसाची सुरुवात चांगल्या विचारांनी होते.

**सुर्योदय - सुर्यास्त**
स.-७:०७ संध्या-६:०७

**सोने – चांदी**
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४५,४८०/- २,९२,०००/-

**केळी भाव**
नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# राज्यात २९ पैकी २४ महापालिकांवर भाजप-महायुतीची सत्ता

## ➤मुंबईत २५ वर्षानंतर सत्तांतर

## जनतेच्या विश्वासाचा कौल; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस







वृत्तसंस्था । मुंबई

**महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांचे निकाल जवळपास स्पष्ट झाले असून, या निकालांनी राज्याच्या राजकारणात मोठा बदल घडवून आणला आहे. भारतीय जनता पार्टी आणि महायुतीने मुंबईत २५ वर्षापासून ठाकरे गटाची सत्ता उलथऊन मुंबईत इतिहास घडविला. तसेच राज्यातील बहुसंख्य महापालिकांवर सत्ता प्रस्थापित केली आहे. निकालानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिली अधिकृत प्रतिक्रिया देत हा विजय जनतेच्या विश्वासाचा कौल असल्याचे सांगितले.**

राज्यातील एकूण २९ महापालिकांपैकी तब्बल २४ महापालिकांमध्ये भाजप किंवा महायुतीची सत्ता येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, जळगाव, धुळे, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या प्रमुख महापालिकांमध्ये भाजप-महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवले असून अनेक ठिकाणी विरोधकांना दारुण पराभवाला सामोरे जावे लागले आहे. काही महापालिकांमध्ये भाजपने यापूर्वीचे निवडणूक विक्रम मोडत नवे इतिहास रचले आहेत.

या निवडणुकांमध्ये भाजप आणि महायुतीने विकास, पारदर्शकता आणि प्रामाणिक प्रशासनाचा अजेंडा घेऊन मतदारांसमोर भूमिका मांडली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मांडलेल्या विकासाच्या दृष्टीकोनालाच मतदारांनी पसंती दिल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

राजकारणात केवळ आरोप-प्रत्यारोप न करता विकासकामांचा लेखाजोखा जनतेसमोर मांडला. जनतेला स्थिर, सक्षम आणि विकासाभिमुख प्रशासन हवे आहे, हे या निकालातून स्पष्ट झाले आहे, असे ते म्हणाले.

प्राथमिक आकडेवारीनुसार मुंबई महापालिकेत भाजप-शिवसेना (शिंदे गट) १२२ जागांवर आघाडीवर असून, शिवसेना (ठाकरे गट) आणि मनसे मिळून ७२ जागांवर आघाडीवर असल्याचे चित्र आहे. त्यामुळे मुंबईसह संपूर्ण राज्यात भाजप-महायुतीच्या सत्तेचे वर्चस्व अधिक ठळक होत असून, आगामी काळात राज्याच्या राजकारणात याचे पडसाद उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**➤ निवडणूक निकालांनंतर पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राच्या जनतेचे मी मनापासून आभार मानतो. महापालिका निवडणुकांमध्ये भाजप आणि महायुतीला अभूतपूर्व महाविजय मिळाला आहे. २९ पैकी तब्बल २५ महापालिकांमध्ये आमची सत्ता येत आहे. हा विजय म्हणजे विकासाच्या राजकारणावर जनतेने दाखवलेला विश्वास आहे. मुंबई महापालिकेच्या निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. यासंदर्भात बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी ठाम भूमिका मांडली. सध्या काही प्रभागांमध्ये मतमोजणीला उशीर होत असला तरी आतापर्यंतचे कल पाहता मुंबई महापालिकेतही महायुतीला स्पष्ट बहुमत मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुंबईमध्येही महायुतीचा झेंडा फडकणार आहे. जनतेने विकासाच्या बाजूने स्पष्ट कौल दिला आहे, असे ते म्हणाले.**

## थोडक्यात

### विराट कोहलीचा मोडला विक्रम

**ऑस्ट्रेलिया ।** ऑस्ट्रेलियन क्रिकेटचा दिग्गज सलामीवीर डेव्हिड वॉर्नरने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असली, तरी बॅटमधील त्याची धार अजूनही कायम आहे. बिग बॅश लीगमध्ये (इइङ) शुक्रवारी सिडनी सिक्सर्सविरुद्ध खेळताना वॉर्नरने स्फोटक शतक झळकावत नवा इतिहास रचला. या शतकी खेळीसह त्याने भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीला एका विशेष विक्रमात मागे टाकले आहे. टी-२० क्रिकेटमध्ये (आंतरराष्ट्रीय आणि लीग मिळून) डेव्हिड वॉर्नरचे हे १० वे शतक ठरले आहे. या शतकासह त्याने विराट कोहलीच्या ९ शतकांचा विक्रम मोडला. टी-२० मध्ये सर्वाधिक शतके ठोकणाऱ्यांच्या यादीत वॉर्नर आता तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे.

### भारताचा बेरोजगारी दर ४.८ टक्क्यांवर

**नवी दिल्ली ।** ग्रामीण भागातील बेरोजगारीचा दर ३.९% आहे. तर शहरी भागातील बेरोजगारीचा दर ६.७% इतका आहे. राष्ट्रीय पातळीवर पुरुषातील बेरोजगारीचा दर ४.१% आहे, तर महिलांच्या बेरोजगारीचा दर ९.१ टक्के इतका असल्याचे सांगण्यात आले. हा बेरोजगारीचा दर चिंताजनक नाही. अनेक महिन्यापासून बेरोजगारीचा दर सध्याच्या आकडेवारीवर स्थिर आहे असे सांगण्यात आले. निर्यात घसरल्यामुळे निर्यात करणाऱ्या कंपन्यांमध्ये काही प्रमाणात बेरोजगारी वाढली असल्याच्या बाबीवर या अहवालात कसलेही भाष्य करण्यात आलेले नाही. जीएसटी कपातीनंतर देशातील कंपन्यांची उत्पादकता वाढत आहे. त्यामुळे शहरातील बेरोजगारीचा दर कमी होण्यास मदत मिळत आहे असे सांगण्यात आले.

## नाशिकमध्ये भाजपची एकहाती सत्ता

वृत्तसंस्था । नाशिक

**नाशिकमध्ये भाजपला एकहाती सत्ता मिळविण्यात यश आले आहे. भाजपचे ७२ उमेदवार विजयी झाले आहेत. तर शिंदेंची शिवसेना २६ आणि ठाकरेंची शिवसेना ११ जागांवर जिंकली आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ४ उमेदवार जिंकलेत. काँग्रेसला ३ तर मनसेला एका जागेवर यश मिळाले आहे. भाजपने एकहाती बहुमताचा ७२ हा जादुई आकडा पार केला आहे. तर एकनाथ शिंदेंची शिवसेना दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे.**



आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाजपने नाशिक महापालिका निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. आता पुढील पाच वर्षांसाठी भाजपचा महापौर बसणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

नाशकात आता शत प्रतिशत भाजपच असून संपूर्ण शहरावर एकहाती वर्चस्व निर्माण करण्यात यश आले आहे.

## राज्यात एमआयएमला ९० जागांवर लक्षणीय यश

### • समाजवादी पार्टीचा मुस्लिमांमधील जनाधार घटल्याने एमआयएमला फायदा

वृत्तसंस्था । मुंबई

असाउद्दिन ओवोसी यांच्या नेतृत्त्वाखालील ऑल इंडिया मजलीस ए- इथेहादूल मुस्लीमन म्हणजेच एमआयएम या पक्षाने महानगरपालिका निवडणुकीत १०० पेक्षा अधिक जागा जिंकून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला आहे. समाजवादी पार्टीचा मुस्लिमांमधील जनाधार घटल्याने त्याचा फायदा एमआयएमने उचलल्याचे गणित मांडले जात आहे. एमआयएमच्या या यशाचा काँग्रेसलाही काही ठिकाणी फटका बसला आहे.



एमआयएमचे सर्वाधिक ३३ नगरसेवक हे छत्रपती संभाजीनगरमध्ये निवडून आले आहेत. मालेगाव २१, नांदेड १३, धुळे १०, मुंबई ७, सोलापूर ८, ठाणे ५, अमरावती ११, नागपूर व परभणी प्रत्येकी एक उमेदवार निवडून आला आहे. एमआयएमच्या या यशाने काँग्रेस, समाजवादी पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार व शरद पवार दोन्ही गट) आदींच्या गोटात धडकी भरणे स्वाभाविक आहे.

मुंबईतील मुस्लीमबहुल प्रभागांमध्ये समाजवादी पार्टीचे सहा ते सात (पान २ वर)

## लातुरला काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीने मिळवली सत्ता

वृत्तसंस्था । लातूर



दलित, मुस्लिम आणि लिंगायत मतांचा आधार घेत आखलेल्या रणनीतीला भाजपच्या चुकीच्या प्रचाराची अप्रत्यक्षपणे साथच मिळाली आणि अमित देशमुख यांनी लातूर महापालिकेत कॉंग्रेसचा झेंडा उंच राखता आला.

दिवंगत विलासराव देशमुख यांच्या विरोधातील वक्तव्य लातूरकर सहन करत नाहीत, असा संदेशही लातूरकरांनी दिल्याचे मानले जात आहे.मराठवाड्यात कॉंग्रेस वर्चस्वाची ही एकमेव महापालिका आहे. एकूण ७० जागांपैकी कॉंग्रेस व वंचित बहुजन आघाडीने ४७ जागा जिंकल्या. लातूर महापालिकेत सत्ता स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला असून वंचित बहुजन आघाडीने पाच जागा पटकावल्या. भाजपला २२ जागांवर समाधान मानावे लागले आणि (पान २ वर)

## घड्याळ्याचे काटे उलटे फिरले, तुतारीचा आवाज बंद

### • पुण्यात भाजपाने अजित पवारांना डिवचलं

वृत्तसंस्था । पुणे

**संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून असलेल्या पुणे महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने दणदणीत विजय मिळवला, तर उपमुख्यमंत्री अजित पवार व ज्येष्ठ शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा युतीला दारुण पराभवाचा सामना करावा लागला.**

आतापर्यंतच्या निकालानुसार भाजपाने पुण्यातील १६५ पैकी तब्बल ११० जागांवर विजय मिळवून बहुमताचा आकडा पार केला आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन्ही गटांना केवळ २१ जागांवरच समाधान मानावे लागताना दिसून येत आहे. त्याशिवाय काँग्रेसचे आठ जागांवरील उमेदवार आघाडीवर आहेत. विशेष बाब म्हणजे- पुण्यात शिंदे व ठाकरे गटाला आतापर्यंत भोपळाही फोडता आलेला नाही. या अभूतपूर्व यशानंतर पुण्यातील स्थानिक नेत्यांनी बॅनरबाजी करून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना डिवचले आहे. पुणे शहरात काढलेल्या विजयी मिरवणुकीत भाजपाचे कार्यकर्ते बॅनर घेऊन सामील झाले होते. ‘ओ दादा पुण्यात अण्णाच भारी’, ‘पुण्याचा धुरंधर आपला मुरलीधर’, ‘टांगा पलटी अन् घोडे फरार’, ‘घड्याळ्याचे काटे उलटे फिरले, तुतारीचा आवाज बंद’, अशा आशयाचा मजकूर या बॅनर्सवर छापण्यात आला होता. यादरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादीच्या पराभवावर प्रतिक्रिया दिली. जनतेचा कौल मी आदराने स्वीकर करतो, असे त्यांनी म्हटले आहे. (पान २ वर)

**➤ भाजपावर केले होते भ्रष्टाचाराचे आरोप**



**यादरम्यान प्रचारवेळी अजित पवार यांनी पिंपरी-चिंडवड येथील भाजपाच्या स्थानिक नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोपही केले होते. त्यावेळी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी त्यांना इशारा दिला होता. एकाच वेळी राज्याच्या सत्तेत भाजपाचा भागीदार तर त्याचवेळी भाजपाच्या विरोधातील राष्ट्रवादी शरद पवार गटाशी हातमिळवणी अशा दोन्ही डगरींवर अजित पवारांनी पाय ठेवला होता; परंतु या प्रतिष्ठेच्या लढाईत दोन्ही महानगरपालिकांमधील मतदारांनी अजित पवारांना सपशेल नाकारल्याचे दिसून आले. त्यांच्या मोफत बस व मेट्रो प्रवासाच्या आश्वासनाचाही फारसा फरक पडला नाही.**

## ...अखेर डोनाल्ड ट्रम्प यांना शांततेचे नोबेल

### व्हेनेझुएला ताब्यात घेतल्यानंतर पुरस्कारासह मिळाले सुवर्ण पदकही

वृत्तसंस्था । इस्लामाबाद

**नोबेल शांतता पुरस्कार मिळण्याच सुप्त इच्छा असलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांचं अखेर स्वप्न पूर्ण झालं आहे. व्हेनेझुएलाच्या विरोधी पक्षनेत्या मारिया कोरिना मचाडो यांनी त्यांना मिळालेला शांतता पुरस्कार डोनाल्ड ट्रम्प यांना देऊ केला आहे. गुरुवारी व्हाईट हाऊसमधअये झालेल्या बैठकीत पुरस्कारासोबत येणारं सुवर्णपदकही देण्यात आलं. गेल्या महिन्यात मचाडो यांना हा पुरस्कार मिळाला होता. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**

सोशल मीडियावरील पोस्टमध्ये डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, ‘मारियाने माझ्या कामासाठी मला तिचा नोबेल शांतता पुरस्कार प्रदान केला. परस्पर आदराचे हे अद्भुत उदाहरण आहे. धन्यवाद मारिया!’ तर, माचाडो यांनी ही बैठक उत्कृष्ट असल्याचे वर्णन केले परंतु अधिक तपशील दिले नाहीत. त्यांनी सांगितले की हे पदक ट्रम्प यांच्या व्हेनेझुएलाच्या लोकांच्या स्वातंत्र्याप्रती असलेल्या वचनबद्धतेची ओळख पटवणारे एक संकेत आहे.

नोबेल शांतता पुरस्कार कोणालाही हस्तांतरित करता येत नाही, किंवा काढूनही घेतला जाऊ शकत नाही असं नॉर्वेजिअन नोबेल संस्थेने म्हटलं आहे. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांना ही पदवी दिली असली तरीही ते सुवर्णपदक मचाडो यांच्याकडे राहणार की ट्रम्प यांच्याकडे राहणार हा प्रश्न अनुत्तरित आहे.या आठवड्याच्या सुरुवातीला जेव्हा ट्रम्प यांना विचारले गेले की त्यांना हा पुरस्कार हवा आहे का, तेव्हा त्यांनी रॉयटर्सला सांगितले, ‘नाही, मी तसं म्हणायचं नव्हतं. तिला नोबेल शांतता पुरस्कार मिळाला’. ‘मी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना नोबेल शांतता पुरस्कार पदक प्रदान केले,’ असे मचाडो यांनी पत्रकारांना सांगितलं.







## राहुल गांधींचा निवडणूक आयोगावर महाराष्ट्रात मतचोरीचा आरोप, म्हणाले, ‘हे देशविरोधी कृत्य

वृत्तसंस्था । दिल्ली



**राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी गुरुवारी (१५ जानेवारी) मतदान झालं आणि मतमोजणी आज (१६ जानेवारीला) सुरू आहे. निवडणुकीत मतदानाची प्रक्रिया पारदर्शक ठेवण्यासाठी मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर शाई लावली जाते. मात्र, मतदानानंतर ही शाई पुसली जातेय, अशा अनेक तक्रारी समोर आल्या. त्यानंतर मनसे, काँग्रेस तसेच ठाकरेंच्या शिवसेनेकडून निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.**

महाराष्ट्र महानगरपालिका निवडणुकीत, विशेषतः मुंबई महानगरपालिका २०२६ च्या संदर्भात बोटावरील शाई पुसली गेल्याच्या प्रकरणावर राहुल गांधी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. राहुल गांधींनी निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली आणि लोकांचा लोकशाहीवरील विश्वास पूर्णपणे ढासळला आहे, असं म्हटलं. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य (पान २ वर)

## संपादकीय

### नवी दिशा

भारत आणि अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री यांच्यात मंगळवारी चर्चा झाली. चर्चा सकारात्मक झाल्याचे नेहमीप्रमाणेच सांगण्यात आले. अमेरिकेनेही तिकडे निवेदन जारी केले. आर्थिक सहकार्य मजबूत करण्याबाबत दोन्ही देशांचे समान हितसंबंध असल्याचे अमेरिका म्हणते. गेल्याच आठवड्यात त्यांचे नवनियुक्त राजदूत सर्जिओ गोर यांनीही भारताप्रति अमेरिकेचे विशेष ममत्व असल्याचा दावा केला. व्यापार करारावर दोन्ही देशांची सक्रिय चर्चा सुरू असल्याचे ते म्हणाले. आठ महिने ही चर्चा सुरू आहे. सगळेच सकारात्मक आहे तर त्यातून काही निष्पन्न का होत नाही, हे अमेरिकेलाच माहिती. अमेरिकेने भारतावर २५ टक्के कर लावला आहे. रशियाकडून तेल खरेदी करतो म्हणून अतिरिक्त २५ टक्के दंडही त्यांनी भारताला ठोठावला आहे. अमेरिकेत एक विधेयकही मांडले आहे. त्या विधेयकातील प्रमुख आणि एकमेव मुद्दा भारत आणि चीन यांना इशारा देणारा आहे. जे देश रशियाकडून तेल खरेदी करतील त्यांना ५०० टक्के कर लावण्याची तरतूद या विधेयकात आहे. चीन अमेरिकेला भीक घालत नाही. भारत अमेरिकेच्या विरोधात काही बोलत नाही. चीन अमेरिकेला घाबरत नसल्यामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो. भारत घाबरत असल्यामुळे दुर्लक्ष करतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील मैत्री भारतात जगप्रसिद्ध आहे. त्या मैत्रीचा लाभ झालेला नाही, उलट या असलेल्या-नसलेल्या किंवा भासवलेल्या मैत्रीचाच ट्रम्प यांना राग आला की काय असे मानावे अशी स्थिती आहे. कारण, काहीही असो एकट्या अमेरिकेच्या भरवशावर विसंबून राहता येणार नाही हेही तेवढेच खरे. ही केवळ भारतीयांची भावना नाही तर जगात सगळीकडे साधारणत: अशीच स्थिती आहे. फ्रान्सच्या मॅक्रॉन यांच्यापासून जर्मनीच्या शोल्झ यांच्यापर्यंत युरोपातील सगळे नेते ट्रम्प यांच्या लहरी स्वभावाबाबत सावध भूमिका घेताना दिसतात. ट्रम्प यांची रात्री किंवा सकाळी केलेली एखादी पोस्ट त्यांचा आणि अमेरिकेचा व्यापार अथवा अन्य व्यावसायिक संबंध धोक्यात आणू शकतात अशी युरोपातल्या नेत्यांना भीती वाटते. नाटोलाही त्याचा हादरा बसू शकतो, असे त्यांना भय आहे. नाटोचे अस्तित्व माझ्यामुळेच असल्याचे म्हणून ट्रम्प यांनी त्यांची ही भीती आणखी घट्ट केली आहे. ब्रिटनचे स्टार्मर किंवा ऑस्ट्रेलियाचे अल्बानीज यांची वेगळी स्थिती नाही. भारताप्रमाणेच यांचेही अमेरिकेसोबत व्यावहारिक हित गुंतले आहेत. तथापि, पूर्णपणे हुकूमशाही वृत्तीकडे झुकलेले ट्रम्प विविध जागतिक मंचांवर सगळ्यांचीच खिल्ली उडवताना दिसतात. मूलत: त्यांचे कोणतेही विधान किंवा भूमिका ही साबणामुळे निर्माण झालेल्या बुडबुड्यासारखी असते. बुडबुडा जेवढ्या लवकर तयार होतो, तेवढ्याच लवकर फुटतोही. ट्रम्प तसेच करतात. ग्रीनलँडवरून डेन्मार्कला धमकावणे, मेक्सिकोला दमात घेणे, व्हेनेझुएलावर अप्रत्यक्ष कब्जा करणे आणि आता इराणमधील अराजकाला उघड उघड मानवाधिकार आणि लोकशाहीचे घोंगडे पांघरून खतपाणी घालण्याचा प्रयत्न करणे. या सगळ्या बाबी एकच स्पष्ट करतात की अमेरिका किंवा अमेरिकेत जोपर्यंत ट्रम्प आहेत तोपर्यंत त्या देशाकडून कोणत्याही अपेक्षा न केलेल्या बर्या. भारत-अमेरिका संबंधांना नवी दिशा मिळणार असल्याचे त्यांचे परराष्ट्र मंत्री मार्को रूबिओ म्हणतात. पण व्यापार कराराचे घोंगडे त्यांनी ज्या प्रकारे भिजत ठेवले आहे त्यावरून त्यांची नियत चांगली नाही हेही उघड होते. करार व्हायचाच असता तर जून अथवा जुलैमध्येच झाला असता.

# जळगाव मनपावर महायुतीचेच वर्चस्व

**● भाजप ४६, शिवसेना २२, राष्ट्रवादी काँग्रेस ०१, शिवसेना ठाकरे गट ०५, अपक्ष ०१**

प्रतिनिधी । जळगाव

महापालिकेच्या निवडणुकीत महायुतीने ७५ पैकी ६९ जागा जिंकत आपले निर्विवाद बहुमत सिद्ध केले आहे. मागारी वेळी भाजप-६ व शिंदेसेनेच्या ६ जागा बिनविरोध निवडून आल्याने सुरूवातीपासून निर्णायक आघाडी घेणारी महायुती अखेर स्पष्ट बहुमतापर्यंत पोहोचली आहे. भाजप-४०, शिवसेना शिंदे गट- १६, राष्ट्रवादी अजित पवार गट-०१, शिवसेना ठाकरे गट- ०५ आणि अपक्ष-०१, अशी विजयी उमेदवारांची स्थिती आहे. भाजपसह शिंदे गटाचा प्रत्येकी १ तर अजित पवार गटाचा ४ जागांवर पराभव झाला आहे.



महायुतीच्या माध्यमातून भाजपने ४७, शिवसेना शिंदे गटाने २३ आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाने ५ ठिकाणी उमेदवार उभे केले होते. पैकी भाजपने ४६ जागांवर, शिवसेना शिंदे गटाने २२ जागांवर आणि अजित पवार गटाने फक्त एका जागेवर विजय मिळवला आहे.. टपाली मतमोजणी सुरू झाल्यापासून भाजसपसह शिंदे गटाच्या उमेदवारांनी मोठी आघाडी घेतली होती, ती अखेरपर्यंत कायम राहिली आहे.

जळगाव शहर महानगर पालिका निवडणूक : प्रभाग निहाय विजयी उमेदवार..

प्रभाग क्रमांक १- अ मधून रिता विनोद सपकाळे (भाजप ), ब मधून दिलीप बबनराव पोकळे (शिवसेना), क संगीता दांडेकर (शिवसेना), ड मध्ये भारती सागर सोनावणे (अपक्ष), प्रभाग क्रमांक २- अ मधून सागर शामकांत सोनवणे (शिवसेना), ब उज्ज्वला किशोर बाविस्कर (शिवसेना), क मध्ये पूजा विजय जगताप (भाजप), ड मधून विजय गजानन बांदल (भाजप), प्रभाग क्रमांक ३ - अ मधून अर्चना संजय पाटील भाजप), ब मध्ये प्रतीक्षा कैलास सोनवणे (भाजप), क मधून प्रवीण रामदास कोल्हे (शिवसेना), ड मधून निलेश विशवनाथ तायडे (भाजप), प्रभाग क्रमांक ४ - अ मध्ये शशीबाई शिवचरण ढंढोरे (भाजप), ब मध्ये विद्या मुकुंद सोनावणे (भाजप), क मधून कल्पेश कैलास सोनवणे (भाजप), ड मध्ये पियुष ललित कोल्हे (शिवसेना), प्रभाग क्रमांक ५ - अ मध्ये विष्णू रामदास भंगाळे (शिवसेना), ब मंगला संजय चौधरी ( शिवसेना), क आशा रमेश पाटील (भाजप), ड मधून नितीन बालमुकुंद लड्डा (भाजप), प्रभाग क्रमांक ६ - अ अर्शिन बानो शोएब खाटीक (शिवसेना उबाठा), ब मध्ये शुचिता अतुल हाडा (भाजप), क मधून अमित पांडुरंग काळे (भाजप), ड मध्ये दीपक प्रभाकर सूर्यवंशी (भाजप), प्रभाग क्रमांक ७ - अ दीपमाला मनोज काळे (भाजपा),ब मध्ये अंकिता पंकज पाटील (भाजप), क विशाल सुरेश भोळे (भाजप) ड मध्ये चंद्रशेखर अत्तरदे (भाजप), प्रभाग क्रमांक ८ - अ मधून सागर पाटील (भाजप) ब मधून मानसी निलेश भोईटे (भाजप), क अमर जैन (भाजप), ड नरेंद्र आत्माराम पाटील (शिवसेना), प्रभाग क्रमांक ९ - अ मध्ये मनोज सुरेश चौधरी (शिवसेना), ब मधून प्रतिभा गजानन देशमुख (शिवसेना), क जयश्री राहुल पाटील (भाजप), ड मधून चंद्रशेखर शिवाजी पाटील (भाजप), प्रभाग क्रमांक १० - अ मधून सुरेश माणिक सोनवणे (भाजप) ब मधून माधुरी अतुल बारी (भाजप), क मध्ये कविता किरण भोई (भाजप), ड मध्ये जाकीर खान रसूल खान (भाजप) प्रभाग क्रमांक ११ - अ डॉ. अमृता चंद्रकांत सोनवणे (शिवसेना), ब मध्ये संतोष मोतीराम पाटील (शिवसेना), क सिंधुताई विजय कोल्हे (शिवसेना), ड ललित विजय कोल्हे (शिवसेना), प्रभाग क्रमांक १२ - अ मधून अनिल अडकमोल (भाजप), ब उज्ज्वला बेंडाळे (भाजप), क गायत्री राणे (भाजप), ड मध्ये नितीन बरडे (भाजप), प्रभाग क्रमांक १३ - अ नितीन सपके (भाजप), ब मधून सुरेखा नितीन तायडे (भाजप), क मध्ये वैशाली अमित पाटील (भाजप), ड प्रफुल्ल गुलाबराव देवकर (राष्ट्रवादी अजित पवार गट), प्रभाग क्रमांक १४ - अ मधून सुनील सुपडू महाजन (भाजप), ब मधून जयश्री सुनील महाजन (भाजप), क मध्ये राबियाबी अमजद खान (भाजप), ड मधून रितिका संजय ढेकळे (भाजप ), प्रभाग क्रमांक १५ - अ मधून अरविंद देशमुख (भाजप), ब कलाबाई नारायण शिरसाळे (भाजप), क रेशमा कुंदन काळे (शिवसेना), ड मध्ये प्रकाश बालाणी (भाजप), प्रभाग क्रमांक १६ - अ मधून डॉ. वीरेन खडके (भाजप), ब मधून वंदना संतोष इंगळे (भाजप), क रंजना विजय वानखेडे (भाजप), ड मध्ये सुनील वामनराव खडके (भाजप), प्रभाग क्रमांक १७ - अ मध्ये जरीनाबी शब्बीर शहा (उबाठा), ब हीनाबी शाकीर खान (उबाठा), क इब्राहिम पटेल (उबाठा), ड अक्षय वंजारी (उबाठा), प्रभाग क्रमांक १८ -अ डॉ. गौरव चंद्रकांत सोनवणे (शिवसेना), ब मध्ये नलूबाई तुळशीदास सोनवणे (शिवसेना), क मध्ये अनिता सुरेश भापसे (शिवसेना), प्रभाग क्रमांक १९ - अ मध्ये रेखा चुडामण पाटील (शिवसेना), ब गणेश (विक्रम) सोनवणे (शिवसेना), क मध्ये निकिता दुर्गेश वंजारी (शिवसेना), ड मध्ये राजेंद्र घुगे पाटील (भाजप).

### ● ईव्हीएमचे सील तोडल्याचा आरोप

**शहरातील प्रभाग क्रमांक एक ते तीनची मतमोजणी सुरू असताना, काही ईव्हीएम यंत्रांचे सील तुटलेले आढळले. उमेदवार प्रतिनिधींनी पारदर्शकतेबाबत शंका व्यक्त करत मतमोजणी तत्काळ थांबविण्याची मागणी केली. परिस्थिती चिघळण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून त्याठिकाणची मतमोजणी काही काळासाठी स्थगित देखील केली. मुख्य निवडणूक निरीक्षक आणि आयुक्त स्वत: मतमोजणी केंद्रावर दाखल झाले. त्यांनी यंत्रांची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच सील, कागदपत्रे आणि नियमांनुसार प्रक्रिया झाली आहे की नाही, याची तपासणी केली. त्यानंतर मतमोजणी सुरळीत झाली.**

### कुलभूषण पाटलांचा ठिय्या

प्रभाग क्रमांक १० मध्ये शिवसेनेच्या ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख कुलभूषण पाटील यांना ५६९२ मते मिळाली, तर प्रतिस्पर्धी भाजप उमेदवार जाकीर खान रसुल खान यांना ५८९२ मते मिळाली.

खान यांना विजयी घोषित करण्यात आल्यानंतर कुलभूषण पाटील यांनी फेर मतमोजणीची मागणी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे केली. मात्र, त्यांना न्यायालयात जाण्याचा सल्ला देण्यात आला. त्यामुळे उमेदवार पाटील यांनी मतमोजणीच्या ठिकाणीच ठिय्या आंदोलन सुरू केले.



# ललित कोल्हे यांनी तुरुंगातून निवडणूक जिंकली

**पती-मुलाच्या विजयानंतर आता पत्नी पायात चप्पल घालणार**



प्रतिनिधी । जळगाव

एकनाथ शिंदेच्या शिवसेनेचे नेते ललित कोल्हे यांनी तुरुंगातून निवडणूक लढवली आणि जिंकलीदेखील. कोल्हे कुटुंबीयांपैकी तिघांनी निवडणुकीत बाजी मारली आहे. ललित कोल्हे, पियुष कोल्हे आणि सिंधू कोल्हे विजयी झाल्या आहेत. ललित यांच्या पत्नी सरिता यांनी विजयानंतर बोलताना सांगितलं की, ललित तुरुंगात आहेत. त्यांच्यावर घृणास्पद आरोप करण्यात आले. मतदारांनी मताच्या माध्यमातून तुरुंगाला धडक दिली आहे. मताच्या रुपात त्यांनी आमच्यावर प्रेमाचा, कौतुकाचा वर्षाव केला आहे. माझा नवरा, मुलगा आणि सासू असे तिघेही जिंकले आहेत. आम्ही प्रचारादरम्यान पादत्राणं घातली नाहीत. ललित यांना अटक झाल्यापासून आम्ही पादत्राणं घातलेली नाहीत. ते तुरुंगातून परतल्यानंतर पादत्राणं घालेन, असं मी म्हणाले होते. मतदारांनी सगळं शक्य करून दाखवलं आहे.



बोगस कॉल सेंटर चालविल्याच्या आरोपावरून अटकेत असलेले माजी महापौर ललित कोल्हे नऊ दिवसांपासून पोलीस कोठडीत होते. त्यानंतर आता त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, जळगाव कारागृहात पुरेशी जागा नसल्याच्या कारणावरून कोल्हे यांची थेट नाशिक कारागृहात रवानगी करण्यात आली होती.मनसे, भाजप आणि खान्देश विकास आघाडी अशा राजकीय प्रवासानंतर ललित कोल्हे शिंदेसेनेत स्थिरावले आहेत.

डोळ्यासमोर ठेवून जोरदार तयारी काही महिन्यांपासून सुरू केली होती. मात्र, त्याआधीच बोगस कॉल सेंटरच्या माध्यमातून परदेशातील नागरिकांची फसवणूक केल्याच्या आरोपामुळे ते थेट पोलिसांच्या रडारवर आले. त्यांना अटक झाल्यानंतर राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली. जळगाव महापालिका निवडणुकीत भाजपला टक्कर देण्याचे स्वप्न पाहणाऱ्या शिंदे गटाला तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनाही या घटनेने मोठा धक्का बसला आहे. कारण, पारंपरिक वर्चस्व असलेल्या प्रभागांमधून मोठ्या संख्येने नगरसेवक निवडून आणण्याची प्रभावी रणनीती माजी महापौर कोल्हे यांच्याकडे होती. त्याच रणनीतीच्या जोरावर शिंदे गटाला यंदाच्या महापालिका निवडणुकीत आपली ताकद वाढविण्याची संधी होती. मात्र आता ती गणिते बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

बोगस कॉल सेंटर प्रकरणातील संशयित माजी महापौर यांनी काही दिवसांपूर्वी मुलाच्या लग्नाचे निमित्त करून अंतरीम जामीनासाठी जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला होता. मात्र, त्यांचा तो अर्ज न्यायालयाकडून फेटाळण्यात आला. तपासात महत्त्वाच्या तांत्रिक पुराव्यांचा शोध सुरू असल्याने संशयिताला जामीन मिळाल्यास तपासावर परिणाम होऊ शकतो, असेही म्हणणे पोलिसांनी मांडले.

**● बोगस कॉल सेंटर प्रकरणातील संशयित माजी महापौर यांनी काही दिवसांपूर्वी मुलाच्या लग्नाचे निमित्त करून अंतरीम जामीनासाठी जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला होता. मात्र, त्यांचा तो अर्ज न्यायालयाकडून फेटाळण्यात आला. त्यानंतर त्यांनी नुकताच कायम जामीनासाठी अर्ज केला. मात्र, या प्रकरणाचा तपास अद्याप सुरू असल्याचे नमूद करत पोलिसांनी कोल्हेला जामीन देण्यास जोरदार विरोध केला. तपासात महत्त्वाच्या तांत्रिक पुराव्यांचा शोध सुरू असल्याने संशयिताला जामीन मिळाल्यास तपासावर परिणाम होऊ शकतो, असेही म्हणणे पोलिसांनी मांडले.**

## पान १ वरुन

### लातुरला काँग्रेस व वंचित......

भाजपचे सत्तास्वप्न भंगले. शासकीय महिला तंत्रनिकेतन येथे सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. सुरुवातीच्या काही फेऱ्यांमध्ये चुरस दिसून आली, मात्र पुढील फेऱ्यांमध्ये काँग्रेसवंचित आघाडीने सातत्याने आघाडी घेतली आणि अखेर ४७ जागांवर विजय निश्चित केला. काँग्रेसचे नेते अमित देशमुख यांची या विजयामध्ये निर्णायक भूमिका बजावली. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण कलेल्या एका चुकीच्या वक्तव्यामुळे काँग्रेसचा कार्यकर्ता पेटून उठला. या निवडणुकीत लिंगायत मतदान पूर्णत: काँग्रेसच्या बाजूने वळले. शिवाय वंचित आघाडीबरोबर युती केल्याने दलित, मुस्लिम आणि लिंगायत अशी मतपेढी निर्माण झाली. त्यामुळे काँग्रेसचा विजय झाल्याचे मानले जात आहे. प्रचारादरम्यान पालकमंत्री संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, माजी मंत्री बसवराज पाटील मुरूमकर, तसेच राष्ट्रवादीचे बाबासाहेब पाटील, संजय बनसोडे, शिक्षक आमदार विक्रम काळे आदी नेत्यांनी अमित देशमुख यांच्यावर जोरदार टीका केली होती. मात्र त्यांना कोणतेही प्रतिउत्तर अमित देशमुख यांनी दिले नाही. विजयानंतर अमित देशमुख म्हणाले, ङ्ग लातूर हे विलासराव देशमुख यांचे शहर आहे. लातूरकर आपल्या अस्मितेवर आणि ओळखीवर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना मतदानातून उत्तर देतात.फ त्यामुळे लातूरमध्ये हातच भारी ठरली. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसला खातेही उघडता आले नाही. राष्ट्रवादी (अजित पवार गट) चा अपयशी प्रारंभ - लातूरमध्ये पहिल्यांदाच स्वतंत्र ताकदीने लढणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ला अपेक्षित यश मिळाले नाही. केवळ एका जागेवर त्यांना विजय मिळवता आला. पूर्व भागात एमआयएम उमेदवारांना मिळालेल्या मतांमुळेही राष्ट्रवादीला नुकसान झाल्याचे चित्र आहे.

### राहुल गांधींचा निवडणूक......

संस्थांच्या निवडणुकांमध्ये वापरलेली शाई पुसली जात असल्याच्या प्रकरणावरील एका मीडिया रिपोर्टची बातमी राहुल गांधींनी एक्सवर शेअर केली. ङ्घनिवडणूक आयोगाकडून नागरिकांची दिशाभूल केली जात आहे, याचमुळे लोकांचा आपल्या लोकशाहीवरील विश्वास ढासळला आहे. मतचोरी हे देशविरोधी कृत्य आहे,फ्फ्रअसं राहुल गांधी त्यांच्या एक्सवरील पोस्टमध्ये म्हणाले. राहुल गांधींची पोस्ट - दरम्यान, मुंबई महापालिका निवडणुकीसाठी गुरूवारी मतदान झालं. मतदानाचा दिवस शाईमुळे चर्चेत राहिला. बोटावरची मार्करची शाई काही सहज उपलब्ध असलेल्या केमिकल्समुळे पुसली जात असल्याच्या तक्रारी गुरूवारी दिवसभर मतदारांकडून येत होत्या. शाई पुसण्याचे अनेक फोटो व व्हिडीओ मतदार सोशल मीडियावर शेअर करत होते. यामुळे बोगस व दुबार मतदानाची भीती राजकीय पक्षांकडून वर्तवली गेली.मतदानासाठी वापरण्यात आलेल्या शाईचा दर्जा तसेच शाई पुसली जात असल्याबाबत पसरविण्यात येणाऱ्या अफवांच्या चौकशीचे आदेश देण्यात आल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली. बोटावरील शाई पुसण्याचा प्रयत्न करून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हे गैरकृत्य आहे, असंही ते म्हणाले.

### घड्याळ्याचे काटे उलटे......

पुण्यापाठोपाठ पिंपरी-चिंचवड महापालिकेतही भाजपाला विजय मिळाल्याने अजित पवार यांना मोठा धक्का बसला आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने भाजपाला अंगावर घेण्याचा त्यांचा डाव फसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे महायुती सरकारमध्ये भाजपाशी निमटूपणे जुळवून घेण्याची नामुष्की अजित पवारांवर आली आहे. एकसंध राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून बंड केल्यानंतर अजित पवारांनी भाजपाशी जुळवून घेतले होते. त्या तुलनेत एकनाथ शिंदे यांची भाजपबरोबर कुरबूर सुरू असायची; परंतु अजित पवारांनी भाजपाच्या विरोधात कधीच भूमिका घेतली नव्हती. पुणे व पिंपरी चिंचवडमध्ये स्वबळावर लढण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करताच अजित पवारांनी वेगळी गणिते जुळवली आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीशी आघाडी केली.

### राज्यात एमआयएमला......

नगरसेवक अनेक वर्षे निवडून येत असत. अबू आसीम आझमी आणि रईस शेख या दोन आमदारांच्या वादात पक्षाचे मोठे नुकसान झाले. पक्षाचा मुस्लीमबहुल भागातील जनाधार घटला. ही जागा एमआयएमने घेतली आहे. समाजवादी पार्टीला जेवढे यश मिळायचे तेवढेच यश एमआयएमला मिळाल्याकडे काँग्रेसच्या एका नेत्याने लक्ष वेधले. मुस्लीमबहुल भागांमधील प्रभागांमध्ये एमआयएमची पतंग (पक्षाचे निवडणूक चिन्ह) हवेत उडाली आहे. गेली काही वर्षे राज्यात एमआयएमला अपेक्षित यश मिळत नव्हते. लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकांमध्ये राज्यात मुस्लीम मते काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी शरद पवार गट या महाविकास आघाडीच्या परड्यात पडली होती. महानगरपालिका निवडणुकीत मुस्लिम मतांचे विभाजन झाले आहे. एमआयएमला मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दिला आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये अल्पसंख्याकबहुल भागांमध्ये अपेक्षित पाठिंबा मिळतो. यंदा मालेगाव, नांदेड, सोलापूर, अमरावती, धुळे, मुंब्रा आदी मुस्लीमबहुल प्रभागांमध्ये एमआयएमचे उमेदवार चांगल्या मताधिक्याने निवडून आले आहेत. याचाच अर्थ मुस्लीम मते यंदा मोठ्या प्रमाणावर एमआयएमकडे वळल्याचे स्पष्ट होते.लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकांमध्ये मुस्लीम मते मोठ्या प्रमाणावर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला मिळाली होती. मुंबईत शिवसेना व काँग्रेसची आघाडी नव्हती. तसेच उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांच्या युतीमुळे मुस्लिमांची एकगठ्ठा मते शिवसेनेला मिळाली नाहीत. मुस्लिमांनी एमआयएमचा पर्याय स्वीकारला. वास्तविक एमआयएम राज्यात पक्षांतर्गत गटबाजीने पोखरला आहे. संभाजीनगरमधील वाद समोर आला. पक्षाचे नेते इम्तियाज जलील यांच्या वाहनावर हल्ला झाला. मुंबईतही पक्षांतर्गत गटबाजी मोठ्या प्रमाणावर आहे. तरीही मुस्लीस समाजातून एमआयएमला मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळाला.

### रामचरित्र मानसमधील सुंदर कांडवर प्रवचन

प्रतिनिधी । जळगाव

जळगाव येथील माऊली नगर येथे १७ जानेवारी रोजी ओपन पेसमध्ये राम चरित्र मानस मधील सुंदर कांड या विषयावर नंदकिशोर झवर हे प्रवचन दुपारी चार ते सहा या वेळे दरम्यान करणार आहे. कथेत महाराज श्री हनुमंत चरित्र हनुमंत लंका प्रवेश बिबीशन बेट लंका दहन बिबीशन शरणांगती सेतुबंधन इत्यादी विषयावर प्रकाश टाकणार आहेत त्यांना गायनाचार्य ह भ प श्री गुलाबराव कापडणे हे सात सांगत करतील तरी भाविकांनी श्रवणाचा लाभ घ्यावा. अशी विनंती आयोजक निळकंठ वाणी यांनी केले आहे. कथेचे ठिकाण माऊली नगर ओपन पेस्ट आशाबाबा नगर अर्थव मेडिकल शेजारी येथे आयोजित केले आहे.

# नगरसेवक विशाल भोळे यांनी भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांसमवेत केला महापालिकेत विजयाचा जल्लोष

प्रतिनिधी । जळगाव

ढोल ताशांच्या गजरात प्रचंड आतिषबाजी आज जळगाव शहर महानगरपालिकेच्या ७५ प्रभागाचा निकाल जाहीर झाला असून भारतीय जनता पार्टी महायुतीला प्रचंड प्रमाणात यश प्राप्त झाले असून या विजयाचा जल्लोष दि. १६ जानेवारी रोजी सकाळी ११:३० भाजप कार्यालय जी एम फाउंडेशन समोर शिवतीर्थ मैदान येथे नवनिर्वाचित नगरसेवक विशाल सुरेश भोळे यांनी भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ कार्यकर्ते मा अध्यक्ष सुभाषतात्या शौचे व माजी नगरसेवक उदय भालेराव व कार्यालय मंत्री प्रकाश पंडित या जेष्ठ पदाधिकारी व कार्यकर्त्यांन समवेत विशाल भोळे यांनी प्रचंड आतिषबाजी ढोल ताशांच्या गजरात आनंदोत्सव साजरा केला.



या प्रसंगी महिला मोर्चाच्या अध्यक्षा नितू परदेसी, जिल्हा पदाधिकारी रेखाताई वर्मा, निला चौधरी, मनोज भांडारकर, दिप्ती ताई चिरमाडे, रेखा कुलकर्णी शौभा ताई कुलकर्णी, रेखा पाटील, सविता बोरसे, युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## थोडक्यात

### आष्टे येथे रक्तदान शिबिर

**नंदुरबार ।** तालुक्यातील आष्टे येथे जगद्गुरू नरेंद्रचार्य रामनंदाचार्य दक्षिणपिठ नाजिजधाम यांच्या प्रेरणेने जीवनदान महाकुंभकार्यक्रमातंर्गत रक्तदान शिबीर घेण्यात आले.शिबीर पं.स.चे माजी उपसभापती कमलेश महाले यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी निलेश खैरनार, राकेश शेवाळे, समाधान शेवाळे, निरीक्षक खर्जुल तात्या, सुकलाल पवार, कांतीलाल पवार, विजय सोनवणे, ऋतिक कलाल, ईश्वर सुर्यवंशी, कमलेश शिंपी, देविदास पाटील, आदी उपस्थित होते.



### नायलॉन मांजा बाळगल्याप्रकरणी गुन्हा

**नवापूर ।** प्रतिबंधीत नायलॉन मांजा कब्जात बाळगल्याप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत ८०० रुपयांचा हिखा नायलॉन मांजा जप्त करण्या आला. गोविंदसिंग भेरुसिंग राजपुरोहित (रा. जनता पार्क नवापूर) हा प्रतिबंधीत नायलॉनचा मांजा कब्जात बाळगतांना आढळून आला. त्याच्याकडून ८०० रुपये किमतीचा मोनो काईट कंपनीचा मांजा आढळून आला. याबाबत नवापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास राजधर जगदाळे करीत आहेत.

### नगावबारीत दगडफेकप्रकरणी ३३ जणांविरुद्ध गुन्हा

**धुळे ।** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देवपूरातील नगावबारी परिसरात शिवसेना उमेदवाराच्या घरावर दगडफेक व तोडफोड झाल्याची घटना १४ जानेवारी रोजी सायंकाळी घडली होती. याप्रकरणी देवपूर पोलिसात परस्परविरोधी फिर्यादीवरून ३३ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. साक्षी मनोज मोरे (वय २४) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, देवपूरातील कृषी कॉलनीतील प्लॉट क्र.८१ येथील घरावर दगडफेक करण्यात आली. अंगणात ठेवलेल्या खुच्र्यांची मोडतोड करण्यात आली. तसेच घराजवळ उभ्या असलेल्या वाहनांवर दगडफेक व लोखंडी रॉडने वाहनांचे नुकसान झाले. घराच्या खिडक्यांच्या काचा फोडण्यात आल्या. शिवीगाळ व धमकी देत जमावाने दहशत निर्माण केल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण होते. याप्रकरणी संशयित विलास शिंदे, भूषण शिंदे, आकाश शिंदे, अमोल सूर्यवंशी, मयूर चौधरी यांच्यासह १५ ते २० अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धुळे महापालिकेवर फडकला भगवा

## भाजप ५०, एमआयएम १०, राष्ट्रवादी काँग्रेस ०८, शिवसेना ०५, अपक्षा ०१ असे उमेदवार विजयी झाले

प्रतिनिधी । धुळे



**येथील महापालिकेच्या १९ प्रभागांतील ७२ जागांसाठी गुरुवारी (ता. १५) मतदान झाले. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने लढविलेल्या ६२ जागांपैकी तब्बल ५० जागांवर अभूतपूर्व विजय मिळवत महापालिकेची सत्ता काबीज केली आहे. अपवाद वगळता भाजपच्या बहुतांश उमेदवारांच्या गळ्यात धुळेकरांनी विजयाची माळ घातल्याने आमदार अनुपभय्या अग्रवाल यांच्या येथील मालेगाव रोडवरील जनसंपर्क कार्यालयात आज दुपारी बारापासूनच अभूतपूर्व जल्लोषाला प्रारंभ झाला. जय श्रीरामचा जयघोष आणि भगव्या गुलालची उधळण करत कार्यकर्त्यांनी आमदार कार्यालयात नृत्याचा ठेका धरल्याने वातावरण अक्षरशः भगवामय झाले होते.**

येथील महापालिकेच्या निवडणुकीच्या मतमोजणीला आज सकाळी दहापासून प्रारंभ झाला. पहिल्या दीड-दोन तासांतच निकालाचे चित्र स्पष्ट होऊ लागल्याने भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून एकच जल्लोष सुरू झाला होता. येथील आमदार अनुपभैय्यांच्या कार्यालयात आज सकाळपासूनच आमदार अग्रवाल यांच्यासह माजी मंत्री डॉ. सुभाष भामरे, आमदार कुणाल पाटील यांच्यासह भाजपचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. जसजसा एकेक प्रभागाचा निकाल जाहीर होत होता, तसा सर्वांकडून जल्लोष करण्यात येत होता. तसेच अधिकृत निकाल जाहीर झाल्यानंतर भाजपच्या विजयी उमेदवारांसह त्यांचे समर्थक, कार्यकर्ते मतमोजणी केंद्रापासून थेट आमदार अनुपभैय्यांच्या कार्यालयात मिरवणुकीने पोहोचत होते. तेथे आल्यानंतर आमदार अनुपभैय्यांसह विजयी उमेदवारांना खांद्यावर घेत समर्थकांकडून जोरदार जल्लोष करण्यात येत होता. यामध्ये भगव्या गुलालाची उधळण करण्यात येत असल्याने संपूर्ण कार्यालय परिसर भगवामय झाला होता. सोबतीला जय श्रीरामच्या गीतांसह ढोल-ताशांच्या गजरात नृत्याचा ठेका धरत कार्यकर्त्यांनी विजयाचा आनंदोत्सव साजरा केला. दुपारी उशिरापर्यंत हा जल्लोष सुरूच होता. संपूर्ण आमदार कार्यालय भगव्या गुलालाने माखून गेले होते.

विकास का पहिया-अनुपभय्या, जय श्रीराम, भारतीय जनता पक्षाचा विजय असो आदी घोषणांनी आमदार कार्यालयाचा परिसर दिवसभर दणाणून गेला. कार्यकर्त्यांसह समर्थकांचा उत्साह इतका शिगेला पोहोचला होता, की प्रत्येक विजयी उमेदवारासह आमदार अनुपभैय्या अग्रवाल यांना खांद्यावर घेत जल्लोष केला जात होता. आमदार अग्रवाल यांनी प्रत्येक विजयी उमेदवाराचा पुष्पगुच्छ देत सत्कार करत त्यांच्यासमवेत जल्लोष साजरा केला. राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन, जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, आमदार अनुपभय्या अग्रवाल, आमदार राम भदाणे, माजी मंत्री डॉ. सुभाष भामरे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, माजी आमदार कुणाल पाटील यांच्या नेतृत्वात धुळे महापालिकेत भाजपने पुन्हा एकदा सत्ता काबीज केल्याने शहरात ठिकठिकाणी भाजपच्या कार्यकर्त्यांसह पदाधिकाऱ्यांकडून जल्लोष करण्यात येत होता.

### ➤ धुळेकर जनतेचे मनापासून आभार

भारतीय जनता पक्षाच्या विकासात्मक राजकारणाला पाठिंबा देत धुळे महापालिका निवडणुकीत धुळेकर जनतेने पक्षाच्या उमेदवारांवर अभूतपूर्व विश्वास दाखविला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या नेतृत्वातील धुळे महापालिका निवडणुकीच्या लढ्यात जनतेने फक्त आणि फक्त विकासाच्या मुद्यावर भाजपच्या पाठीशी राहत विरोधकांना त्यांची जागा दाखवून दिली. भाजपने लढविलेल्या ६४ पैकी ५० जागांवर विजयाचा कौल देत महापालिकेची सत्ता पुन्हा एकदा भाजपकडे सोपविल्याने धुळेकर जनतेचे मनापासून आभार मानतो. धन्यवाद.

**- आ. अनुपभैय्या अग्रवाल,**
धुळे शहर



**विजयी उमेदवार -** अपक्ष -रऊफ खान हुरमत खान पठाण, शिवसेना - छाया किरण अहिरराव, दीपक सुरेश खोपडे, धीरज जवाहरलाल कलंत्री, गीता सुरेश नवले, मंगला सुनील सोनवणे. राष्ट्रवादी - शहनाजबी गुलाम खाटीक, अनम शेख तौहिद, इरफान अन्सारी, परविन बानो शेख रफिक, मतीन अहमद, फातेमा बी नूरुल अमिन, शाह शाहबाज फारुक शहा, नजमा शफी शाह, एम आय एम - मंसूरी मुक्तार कासिम, हसीना बानो अन्सारी, शेख शहाजहान, मिर्झा शोयब नवाब बेग, अन्सारी अब्दुल हमीद, अन्सारी अमेरा बानो, अन्सारी हलीमा बानो, युसुफ मुल्ला, मदिना समशेर पिंजारी, अमीर असलम पठाण, भाजप - कविता शरद सोनवणे, निशा सुशील कुमार महाजन, प्रभावती विलास शिंदे, सुनील वसंतराव सोनार, शोभा संजय भिल, मीनल आकाश परदेशी, युवराज लक्ष्मण चौधरी, देवेंद्र चंद्रकांत सोनार, नागसेन दामोदर बोरसे, प्रतिभा शिवाजीराव चौधरी, संध्या सागर कदम, कृपेश लक्ष्मण नांद्रे, भगवान शंकर गवळी, जोशना प्रफुल्ल पाटील, वैभवी अमित दुसाने, कमलेश नारायण देवरे, वंदना संजय भामरे, रंगनाथ रतन ठाकरे, रूपाली जगदीश पाटील, विजय अरुण देवरे, प्रियंका खंडू बोरसे, उज्वला अनिल ठाकरे, निलेश चंद्रकांत नेमाने, पुनम जितेंद्र शिरसाट, प्रदीप पुरण दास बैरागी, संजय सुधाकर जाधव, सुनील तुळशीराम बैसाणे, प्रतिभा अनिल पाटील, किरण राकेश कुलेवार, ललित वीरभान अरुजा, रोहित भानुदास चांदोडे, मायादेवी महादेव परदेशी, कल्पना सुनील महाले, चेतन संजय गवळी, प्रतीक प्रदीप करपे, जयश्री कमलाकर अहिरराव, विक्रम फकीरा थोरात, धीरज रामेश्वर परदेशी, कल्याणी सतीश अंपळकर, पुष्पा राजेश पवार, अमोल पावबा मासुळे, सुरेखा चंद्रकांत उगले, चित्रलेखा विकी परदेशी, सारिका प्रवीण अग्रवाल.




**धुळे - राज्याचे राजशिष्टाचार व पणन मंत्री, पालकमंत्री जयकुमार रावल यांचा वाढदिवसानिमित्त भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी यांनी सत्कार केला.**


### आदर्श विद्यालयात इ-कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती

प्रतिनिधी । नंदुरबार

तालुक्यातील सुंदरदे येथील आदर्श माध्यमिक विद्यालय सुंदरदे येथे ईकचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती कार्यक्रम पूर्ण इकोविजन फाउंडेशन व आदर्श विद्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने ईकचरा व्यवस्थापन कसे करावे. याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. ईकचरा व्यवस्थापनाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शाळेचे सहशिक्षक भगवानसिंग राजपूत यांची वॉलेंटियर म्हणून नेमणूक करण्यात आली.

## बर्डीपाडा टोलनाक्याजवळ आयशर ट्रकचे नियंत्रण सुटल्याने अपघात

प्रतिनिधी । नवापूर



धुळे - सुरत राष्ट्रीय महामार्गावरील बर्डीपाडा टोलनाक्याजवळ बुधवारी रात्री सुमारे नऊ वाजेच्या सुमारास आयशर ट्रकचा भीषण अपघात झाला. धुळ्याहृ सुरतच्या दिशेने भरधाव वेगात जाणारा आयशर ट्रक (क्र. चक४० ऊ ७७७४) टोलनाक्याजवळ अचानक चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्त्यावर पलटी झाला. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र अपघाताची तीव्रता मोठी असून ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अपघातात ट्रकचे पुढील टायरही निखळून पडले असून वाहन पूर्णतः नुक्सानग्रस्त झाले. या घटनेत ट्रक चालक संदीप परपेती (रा. सारवाडी, जि. वर्धा) हे किरकोळ जखमी झाले असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले.

अपघातानंतर चालक संदीप परपेती यांनी सांगितले की, टोलनाक्याजवळ रस्त्याची कोणतीही स्पष्ट माहिती उपलब्ध नव्हती. सूचना फलक, रेडियम स्टिकर व बॅरिकेड्सचा अभाव असल्यामुळे अचानक गोंधळ उडाला आणि वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात झाला. या अपघातानंतर महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणा व पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. खराब झालेला ट्रक बाजूला काढल्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात

## विविध मागण्यांसाठी शहाद्यात माकपाचा मोर्चा, कायद्याप्रमाणे रोजगार भत्ता देण्याची मागणी

प्रतिनिधी । शहादा



जलजीवन मिशनची कामे मुदतीत पूर्ण झाली पाहिजे, शेतमजुरांना कामगार कायद्याप्रमाणे रोजगार भत्ता दिला पाहिजे यासह विविध मागण्यांसाठी माकपा व शेतमजूर युनियनतर्फे येथील उपविभागीय कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. मोर्चाचे नेतृत्व कॉ. सुनील गायकवाड यांनी केले.

यावेळी उपविभागीय अधिकारी कृष्णकांत कनवारिया यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, केंद्रशासनाने रोजगार हमी योजनेचे नाव बदलून नवीन नाव दिले ते त्वरित रद्द करावे, शेतमजूर कष्टकरी ग्रामीण व शहरी मजूरांना त्वरीत रोजगार द्यावा किंवा कामगार कायद्याप्रमाणे रोजगार भत्ता द्यावा, तालुक्यातील जल जमीन मिशनच्या कामामध्ये दिरंगाई करणाऱ्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकून सब ठेकेदारांची नेमणूक करून जिल्ह्यातील सर्व व तालुक्यातील अपूर्ण कामे मुदतीत पूर्ण झाली पाहिजेत, तहसीलदार कार्यालयात गेल्या दोन वर्षांपासून राष्ट्रीय अर्थसहाय्याचे मंजूर प्रकरण्याचे अनुदान लाभार्थींच्या खात्यात जमा झाले पाहिजे, संजय निराधार विभागातून, विधवा, घटस्फोटीत, श्रावण बाळ, भूमीहीन शेतमजूर, विकलांग, मुक बधीर, एचआयव्ही बाधीत, अशा विविध योजनांची प्रलंबित प्रकरणे त्वरीत मंजूर करण्यात यावीत, केंद्र सरकारने व राज्य सरकारने शबरी माता घरकुल व रमाई आवास योजनेंतर्गत गेल्या दोन वर्षांपासून प्रकरणे शहादा पं.स. कार्यालयात प्रलंबित आहेत, ते सर्व प्रकरणे मंजूर करण्यात यावी.

महाराष्ट्र रोजगार हमी योजने अंतर्गत व्यक्तीगत लाभार्थ्यांच्या सिंचन विहीर, गुरांचा गोठा आदी प्रलंबित प्रकरणांचा लाभार्थींना लाभ द्यावा, चिंचोरा ग्रुप ग्रा.पं.चे विभाजन करून स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा त्वरीत द्यावो, वन पट्टे धारकांना ७/१२ त्वरीत मिळालाच पाहिजे, शेतीमालाला हमी भावाप्रमाणे दर देण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी, मका, कापूस, मिरची, केळी, पपई या पिकांना हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी होऊ नये यासाठी लक्ष घालावे अशा विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

निवेदन स्वीकारतानाप्रभारी तहसीलदार शैलेंद्र गवते, नायब तहसीलदार वाडीले उपस्थित होते. मोर्चात माकपाचे तालुका सचिव कॉ. सुनिल गायकवाड, पवनसिंग शेवाळे, महाराष्ट्र शेतमजूर युनियनचे अध्यक्ष कॉ. संतोष गायकवाड, बनू भाऊ माळी, भिका ब्राह्मणे, राजाराम ठाकरे, किरण मोरे, दिनेश गुलाले, हरु भाऊ रफीक शेख, मासुम मनियार रमाकांत बच्छाव, अनिल ठाकरे, मेहेरबान पावरा, कॉ. छाया पानपाटील, लखा पावरा, सुदाम चौधरी , बीजू बाई पवार, जिराबाई ठाकरे, विलास भिल, विजय चौधरी, विशाल राहसे, विष्णू ठाकरे, निहाय शेठ, शितल सोनवणे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# नवापूर येथील दाम्पत्याची १ कोटी ३९ लाखांत फसवणूक

## सेवानिवृत्त बँक अधिकाऱ्यासह तिघांना अटक, फसवणुकीचा गुन्हा दाखल

प्रतिनिधी । नवापूर

**म्युच्युअल फंडात गुंतवणूक करा पैसे तीन चार पटीने वाढतील, उतार वयात कामात येतील असे सांगत सेवानिवृत्त शिक्षक दाम्पत्याचा विश्वास संपादन करून स्टेट बँक सेवानिवृत्त अधिकारी यांनी १ कोटी ३९ लाख १५ हजार रुपये परस्पर आपल्या सह पत्नी व नातेवाईक यांच्या नावे धनादेशाद्वारे काढून घेतले. याप्रकरणी स्टेट बँकेच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यासह तिघांना अटक करण्यात आली आहे. या प्रकारामुळे नवापूर शहरात खळबळ उडाली आहे.**

मंजुळाबेन दिनेशचंद्र राणा (वय ७९ वर्षे, धंदा सेवा निवृत्त शिक्षिका, रा.प्लॉट नंबर ७४, मंगलदास पार्क, नवापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून स्टेट बैंक सेवानिवृत्त अधिकारी मधुकर नारायण पाटील, सुनंदा मधुकर पाटील व सुरेश रमेश पाटील (सर्व रा.नवापूर) या तिघांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मंजुळाबेन राणा व त्यांचे पती दिनेशचंद्र गुलाबदास राणा यांच्या नावे असलेल्या भारतीय स्टेट बैंक मुख्य शाखा नवापूर येथे संयुक्त जेष्ठ नागरीक बचत खात्यात त्यांचे सेवानिवृत्तीचे मिळालेले पैसे, सेवा निवृत्तीचा दरमहा वेतनाचे पैसे, दिनेशचंद्र गुलाबदास राणा यांचे वडिलोपार्जीत शेतजमीन विक्री करून मिळालेले पैसे असे बचत करुन ठेवलेले होते. भारतीय स्टेट बँकेत मॅनेजर म्हणुन काम करणार व सध्या सेवानिवृत्त संशयित आरोपी मधुकर नारायण पाटील याने सन २०२० मध्ये फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात स्टेट बँकेत राणा दाम्पत्याला तुमचे बँकेतील बचत खात्यात बरीच रक्कम ही शिल्लक दिसत आहे. मी भारतीय स्टेट बँकेतच म्युच्युअल फंडात गुंतवणुक करण्याकरीता एजंटचेदेखील काम करतो. तुम्ही तुमच्या बचत खात्यातील पैसे हे म्युच्युअल फंडात गुंतवणुक केल्यास तुम्हाला बचत खात्यापेक्षाही पाच ते दहा पट जास्त व्याज मिळेल. तुम्हास भविष्यात तुमचे आजारपणाला देखील पैसे कामात येतील. त्या करीता तुम्हाला फक्त तुमचे पुर्ण कोरे चेकबुकवर फक्त सह्या करुन मला द्यावे लागेल. मी टप्या टप्याने तुमचे चेकद्वारे मुच्युअल फंडात गुंतवणुक करेन असे सांगुन त्यांचा विश्वास संपादन केला. राणा यांनी त्यांच्या बचत खात्यातील शिल्लक रक्कम चांगल्या म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणुक करण्याकरीता विश्वासाने दिलेले सहीचे विना रक्कम व तारखेचे चेक बुक दिले. राणा दाम्पत्य वयोवृध्द असल्याचे व मुलबाळ नसल्याचे पाहून स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी कपटीपणाने कपटीपणाने बुध्दीपुरस्कर वेळोवेळी मोठ मोठ्या रक्कमांची नोंदी चेकवर करुन खोटे चेक हे राणा जिवंत असतांना काढले आहेत. ७ फेब्रुवारी २०२४ रोजी दिनेशचंद्र राणा मयत झाल्यावर सुध्दा २०२५ पावेतो वेळोवेळी बँकेत टाकुन बँक खात्यातुन मधुकर नारायण पाटील (त्याचे स्वतःचे नावे), सुनंदा मधुकर पाटील व सुरेश रमेश पाटील यांच्या नावावर १ लाख, २ लाख, ५ लाख, ९ लाख असे बऱ्याच वेळेस वेळोवेळी वेगवेगळ्या रक्कमा चेकद्वारे पैसे ट्रान्सफर करुन संगनमताने एकुण १ कोटी ३९ लाख १५ हजार रुपये ट्रान्सफर केले. याबाबत नवापूर पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत दिलीप पाटील करीत आहेत. दरम्यान, या प्रकरणी मधुकर नारायण पाटील, सुनंदा मधुकर पाटील व सुरेश रमेश पाटील या तिघांना अटक करण्यात आली आहे.

## कोअण्यापाडा शाळेतील विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप

प्रतिनिधी । अक्कलकुव्वा

**तालुक्यातील कोअण्यापाडा येथील मुख्याध्यापक प्रविण सोनवणे यांच्या प्रयत्नातून विद्यार्थ्यांना मायेची उब देण्यासाठी लोकवर्गणीतून विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप करण्यात आले.**

या कार्यक्रमाचे गटशिक्षण अधिकारी प्रशांत नरवडे तसेच प्रमुख मार्गदर्शक शिक्षण विस्तार अधिकारी कैलास लोहार, जमाना केंद्राचे केंद्रप्रमुख जगदीश पाटील, शालेय व्य.स.चेअध्यक्ष खुमानसिंग वसावे, सतिश पाटील, रामसिंग गुरुजी, पद्मसिंह गिरासे, शैलेश पाटील व पालक यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप करण्यात आले.

यासाठी लेखा अधिकारी देविदास पाटील यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

शिक्षण विस्तार अधिकारी कैलास लोहार, केंद्रप्रमुख जगदीश पाटील यांनी मुख्याध्यापक प्रविण सोनवणे यांच्या विद्यार्थ्यांसाठी राबवित असलेल्या या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले.

# ‘अनेरच्या पुत्राचा’ यशस्वी लढा...!

## जीवघेण्या पुलासाठी मानवाधिकार आयोगाचा प्रशासनाला ८ आठवड्यांचा इशारा!

**प्रतिनिधी । चोपडा**

अनेर नदीवरचा पूल प्रशासकीय अनास्थेमुळे जनतेचा कर्दनकाळ ठरू पाहत आहे, तरीही ढीम्म प्रशासन कोणतीही दखल घेत नसून मुख्यमंत्री कार्यालयापर्यंत तक्रार देऊन काहीही उपयोग होत नसल्याने अखेर मानवाधिकार आयोगाने चोपडा तालुक्यातील दगडी बु।।. येथील रहिवासी व दिल्ली विद्यापीठात कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या गौरव संजय पाटील याच्या तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांना आठ दिवसांत तक्रारीचे समाधान करण्याचे लेखी आदेश फर्मावल्याची माहिती युवकाने दिली आहे.

गौरवने आपल्या मातीतील लोकांचे प्राण वाचवण्यासाठी पुकारलेल्या कायदेशीर लढ्याला मोठे यश आले असून, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने (NHRC) जळगाव जिल्हा प्रशासनाला ८ आठवड्यांच्या आत पुलाचा प्रश्न सोडवण्याचे कडक आदेश दिले आहेत.

मुख्यमंत्री कार्यालयाचे पत्रालाही प्रशासनाने ध्यानीमनी न घेता सोयीस्करपणे काना डोळा केला होता.वास्तविक अनेर नदीचा पूल चोपडा तालुक्यातील मोहीदे आणि शिरपूर





तालुक्यातील होळनांथे यांना जोडणारा महत्त्व पूर्ण पूल असून गेल्या काही वर्षापासून अत्यंत धोकादायक झाला आहे. त्यामुळे दगडी बु।।. येथील रहिवासी गौरव पाटील यांनी या प्रश्नी सातत्याने पाठपुरावा केला. या तक्रारीची दखल घेत मुख्यमंत्री कार्यालयाने जळगाव जिल्हाधिकाऱ्यांना यापूर्वीच पत्र पाठवून तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभाग, चोपडा यांनी (जा.क्र. १०५१/२०२५) हा पूल त्यांच्या हद्दीत नसल्याचे सांगून हात झटकले, तर जिल्हा परिषद प्रशासनानेही याकडे दुर्लक्ष केले. नाशिक विभागीय आयुक्तांनीही या दिरंगाईबद्दल प्रशासनाला यापूर्वीच फटकारले होते.तरीही काहीही उपयोग होत नसल्याचे लक्षात घेऊन सदरील युवकाने राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे तक्रार केली.आयोगाने तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांना आठ आठवड्याच्या आत योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

**मानवाधिकार आयोगाची ऐतिहासिक चपराक**

(Case No. 33/13/12/2026)

मुख्यमंत्री कार्यालयाचे निर्देश आणि विभागीय आयुक्तांच्या सूचना असूनही प्रशासन हद्दीच्या वादात वेळ काढत असल्याचे पाहून गौरवने थेट राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे दरवाजे ठोठावले. घटनेच्या कलम २१ (जीवितेचा अधिकार) अंतर्गत आयोगाने आज या प्रकरणाची दखल घेऊन जिल्हाधिकाऱ्यांना खालील निर्देश दिले आहेत. कालबद्ध कृती: पुढील ८ आठवड्यांत पुलाचा धोका दूर करण्यासाठी ठोस पावले उचलावीत. तक्रारदाराचा सहभाग: या प्रक्रियेत तक्रारदार गौरव पाटील यांना सोबत घेऊन (Associating the complainant) संयुक्त पाहणी व कार्यवाही करावी. पारदर्शकता: केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रशासन, आयोग आणि तक्रारदार यांना सादर करणे बंधनकारक असेल. आता मानवाधिकार आयोगाच्या निर्देशाचे पालन करून प्रशासनाने हा महत्वाचा प्रश्न तातडीने सोडवावा अशी अपेक्षा तक्रारदार गौरव पाटील यांनी व्यक्त केली आहे.

### ➤ तक्रारदार गौरव संजय पाटील यांची प्रतिक्रिया



**दगडी बु।।. चा पुत्र म्हणून माझ्या लोकांचा जीव जातांना पाहणे असह्य होते. मा.मुख्यमंत्री कार्यालयाचे पत्र असूनही स्थानिक प्रशासन ढिम्म होते. आता मानवाधिकार आयोगाच्या आदेशामुळे जिल्हा प्रशासनाची जबाबदारी निश्चित झाली आहे. जर ८ आठवड्यांत कार्यवाही झाली नाही, तर हा लढा आणखी तीव्र केला जाईल. आता आम्हाला केवळ कागदी आश्वासने नको, तर सुरक्षित पूल हवा!असे म्हटले आहे.**

# श्रवण, आकलन अन् चिंतनातून मूल्यांची रूजवणूक

**प्रतिनिधी । यावल**

**शिक्षण मूल्याधिष्ठित व्हावे यासाठी विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार करण्याची सवय, सर्जनशीलता, प्रभावी संवाद कौशल्य आणि सहकार्याची वृत्ती विकसित होणे आवश्यक आहे. श्रवण, आकलन आणि चिंतन या प्रक्रियेतूनच विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची खरी रूजवणूक होते, असे प्रतिपादन बालभारतीच्या मराठी भाषा अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. जगदीश पाटील यांनी केले.**

यावल तालुक्यातील भालोद येथील कला व विज्ञान महाविद्यालयाच्या भारतीय संस्कृती व संस्कार केंद्रातर्फे आयोजित दोनदिवशीय मूल्यशिक्षण व संस्कृती भालोद, ता. वावल भारतीय संस्कृती व संस्कार केंद्र मूल्य शिण आणि संस्कृती कार्यशाळा कार्यशाळेच्या समारोपाप्रसंगी डॉ. जगदीश पाटील यांनी मूल्यशिक्षणासह भारतीय संस्कृती यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. किशोर कोल्हे, उपप्राचार्य प्रा. मुकेश चौधरी, डॉ. सुनील नेवे, डॉ. डिगंबर खोब्रागडे, डॉ. राकेश चौधरी, समुपदेशक आरती चौधरी, शरद झांबरे उपस्थित होते. भारतीय संस्कृती व संस्कार केंद्राचे समन्वयक प्रा.डॉ. सुनील नेवे यांनी प्रास्ताविक केले. समुपदेशक आरती

**● भालोद महाविद्यालयातील मूल्यशिक्षण कार्यशाळेत डॉ.जगदीश पाटील यांचे प्रतिपादन**

चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन प्रा. गीतांजली चौधरी यांनी तर डॉ. राकेश चौधरी यांनी आभार मानले. कार्यशाळेत भालोद येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

सक्रिय सहभागाबद्दल विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. मूल्यशिक्षण व संस्कृती या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. जगदीश पाटील म्हणाले की, ज्ञान मिळवण्याची पहिली पायरी म्हणजे श्रवण होय. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नीट ऐकण्याची सवय लावून घेणे गरजेचे आहे. जेव्हा आपण लक्ष देऊन ऐकतो, तेव्हा त्यातून योग्य आकलन होते. या आकलनावर विचार करणे आणि त्यावर चिंतन करणे हीच शिक्षणाची खरी दिशा आहे.

शिक्षणासोबत भारतीय संस्कारांची जोड मिळाल्यासच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. आजच्या काळात केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून मूल्याधिष्ठित विचारसरणी आत्मसात करणे अत्यावश्यक आहे. समाजात वावरताना केवळ सहानुभूती न ठेवता समानानुभूती बाळगणे अधिक महत्त्वाचे आहे.




## थोडक्यात

### आदिवासी कोळी समाजातर्फे आ. जावळे यांचा सत्कार

**फैजपूर ।** नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका निवडणुकीत आदिवासी कोळी समाजाला प्रतिनिधीत्व मिळाल्याबद्दल यावल तालुक्यातील आदिवासी कोळी समाजाने आ. अमोल जावळे यांचे आभार मानले आणि त्यांचा सत्कार केला. यावल नगरपालिकेत भाजपातर्फे सविता नन्नवरे आणि फैजपुर नगरपालिकेत उपनगराध्यक्षपदी निवडून आलेल्या निकीता कोळी यांना समाजाचे प्रतिनिधीत्व मिळाल्याने हा सत्कार विशेष महत्त्वाचा ठरला. राज्यात कमी वयात शिक्षणाबरोबर समाजसेवा करण्याची संधी मिळाल्याबद्दल उपनगराध्यक्षा निकिता प्रकाश कोळी यांचाही विशेष गौरव यावेळी करण्यात आला. यावेळी आदिवासी कोळी जमातीचे नेते आणि माजी जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली यावल तालुक्यातील प्रकाश कोळी फैजपूर, सरपंच प्रदीप कोळी भालोद, नंदू सोनवणे रिधुर, संदिप सोनवणे वढोदा, मुकेश कोळी यावल, जालंधर कोळी, रोहीदास कोळी पिंप्री, आदी आदिवासी कोळी समाज बांधव उपस्थित होते.

# विवेकानंद विद्यालय चोपड्यातील राकेश विसपुते यांची टॉप टेन बक्षिसासाठी निवड




**प्रतिनिधी । चोपडा**

**येथील महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग संचलित राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था डायट जालना आयोजित राज्यस्तरीय शालेय विविध क्लब सादरीकरण स्पर्धेत जालना येथे संपन्न झालेल्या राज्यस्तर स्पर्धेत ३८ स्पर्धकांमधून पारितोषिकासाठी टॉप -१० क्रमांक राकेश राजकुमार विसपुते तंत्रस्नेही कलाशिक्षक विवेकानंद विद्यालय चोपडा, निमगव्हाण केंद्र, तालुका चोपडा, जिल्हा जळगाव ,विभाग नाशिक यांनी पटकावला.**

विवेकानंद विद्यालयात सुरू असलेल्या विविध क्लब पैकी एक क्लब मशीन व रोबोटिक्स क्लबचे जून पासून तर आतापर्यंतचे केलेल्या कार्याचे सादरीकरण राज्यस्तरावर अतिशय सुंदर पद्धतीने मांडले व टॉप -१० क्रमांक पटकावित राज्यस्तरावर यशस्वी झालेत. त्यांनी जालना येथे राज्यस्तरीय स्पर्धेत नाशिक विभाग, जळगाव जिल्हा, चोपडा तालुका, निमगाव केंद्र ,विवेकानंद विद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. या यशासाठी जालना, नाशिक, नंदुरबार,जळगाव डाएट विभागातील सर्व अधिकारी, अधिव्याख्याते, शिक्षण विभागातील सर्व अधिकारी, तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. विकास हरताळकर, उपाध्यक्ष घनशाम अग्रवाल, सचिव ॲड. रवींद्र जैन, सहसचिव डॉ.विनीत हरताळकर, मुख्याध्यापक नरेंद्र भावे यांच्या सर्व सहकारी शिक्षक बंधू भगिनी ,पालकवर्ग व विद्यार्थीवृंद यांनी अभिनंदन व कौतुक केले. लवकरच भव्य दिव्य समारंभात त्यांना बक्षीस देण्यात येणार आहे.

# शिक्षकाने स्पर्धेत टिकण्यासाठी तांत्रिक कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे : प्रो.आशुतोष पाटील

**प्रतिनिधी । चोपडा**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव पीएम -उषा, नवी दिल्ली अंतर्गत तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय चोपडा यांच्यातर्फे कॅपॅसिटी बिल्डिंग ऑफ टीचर्स या विषयावर आधारित दोन दिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या सुरुवातीला माजी शिक्षणमंत्री कै.मा.ना. अक्कासो. सौ. शरच्चंद्रिका सुरेश पाटील तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून तसेच वृक्षपूजन, वृक्ष जलार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. सोनवणे हे उपस्थित होते. याप्रसंगी कार्यशाळेचे उदघाटक व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,




जळगाव निरंतर अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक प्रा. डॉ. आशुतोष पाटील तसेच प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. सोनवणे, कार्यशाळा समन्वयक उपप्राचार्य डॉ. आर. एम. बागुल, उपप्राचार्य प्रा. डॉ. ए. बी. सूर्यवंशी, समन्वयक डॉ. शैलेशकुमार वाघ आदि मान्यवर उपस्थित होते. या कार्यशाळेचे प्रास्ताविक कार्यशाळेचे समन्वयक व वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. आर. एम. बागुल यांनी केले. या कार्यशाळेच्या प्रास्ताविकेत त्यांनी आर्टीफिसीयल इंटेलिजन्स, मुक्त लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीमसह विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात येत असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली.

प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. सोनवणे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सौ. पी. एम. रावतोळे यांनी केले,डॉ सौदागर यांनी सेशन कोऑर्डीनेशन केले, आभार डॉ. जे. जी. पाटील यांनी मानले.या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी विविध समिती प्रमुख व सदस्यांनी परिश्रम घेतले.

या कार्यशाळेत विद्यापीठ परिसरातील बहुसंख्य शिक्षक कर्मचारी बंधू भगिनी यांनी सहभाग नोंदविला.

**● सदर कार्यशाळेमध्ये विविध महाविद्यालयांमधील ३० प्राध्याकांनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये महाविद्यालया सह विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. याप्रसंगी उदघाटन पर मनोगत व्यक्त करतांना उदघाटक प्रो. डॉ. आशुतोष पाटील म्हणाले की, मशिक्षण हाच सामर्थ्यवान शब्द आहे. आधुनिक काळात येणाऱ्या आव्हानांचा सामना करण्यासाठी प्राध्याकां मधील कौशल्ये विकसित करून शिक्षणाचा पाया मजबूत करण्याची गरज आहे. विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील दरी दूर करण्यासाठी तांत्रिक कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे. अध्ययन व अध्यापन पद्धतीत बदल करावा व विद्यार्थ्यांच्या स्थिती गतीचा विचार करावा. शिक्षकाला स्पर्धेत टिकून राहण्यासाठी व अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी ज्ञान सातत्याने अद्ययावत करणे काळाची गरज आहे.**

# अमळनेर येथील पंजाब नॅशनल बँकेच्या एटीएममधून १० लाखांची चोरी

## चोरट्यांनी एटीएम मशीन फोडून रक्कम लंपास केल्याचा संशय

**प्रतिनिधी । अमळनेर**

**अमळनेर शहरात आज पहाटेच्या सुमारास पंजाब नॅशनल बँक (पीएनबी) च्या एटीएममध्ये मोठ्या प्रमाणावर चोरी झाल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे.**

ही चोरी मश्री गिरीराज ट्रॅव्हल्सफ आणि मअनमोल सुपर शॉपफ यांच्या शेजारील, हाशिम प्रेमजी कॉम्प्लेक्सजवळ असलेल्या पंजाब नॅशनल बँक एटीएममध्ये घडली आहे. घटनेची माहिती मिळताच अमळनेर



पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली असून, एटीएम परिसर क्राईम सीन घोषित करत ‘Do Not Cross’अशा पिवळ्या फिती लावून संपूर्ण परिसर सील करण्यात आला आहे.

**एटीएम मशीन फोडून रोकड लंपास**

सूत्रांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, चोरट्यांनी एटीएम मशीन फोडून त्यातील रोख रक्कम चोरल्याची शक्यता असून, सुमारे १० लाख रुपयांपर्यंत रक्कम लंपास झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.चोरी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आली असून, जड उपकरणांचा वापर करून मशीन उघडण्यात आल्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. घटनेनंतर अमळनेर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. फॉरेन्सिक तज्ज्ञांकडून तपास सुरू असून, बोटांचे ठसे, तांत्रिक पुरावे आणि सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत. एटीएम परिसरातील तसेच जवळच्या दुकानांमधील सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्यासाठी पोलिसांनी प्रक्रिया सुरू केली आहे. शहरातील वर्दळीच्या भागात ही घटना घडल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. रात्रीच्या वेळेस सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, एटीएम सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. एफआयआर नोंदवण्याची प्रक्रिया सुरू असून, लवकरच अधिकृत तपशील समोर येण्याची शक्यता आहे.

### ● अधिकृत माहितीची प्रतीक्षा

**सध्या पोलिसांकडून अधिकृतपणे चोरीच्या रकमेबाबत किंवा आरोपींबाबत कोणतीही ठोस माहिती देण्यात आलेली नाही.**

# बेटावद बु. येथे राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त आरोग्य तपासणी शिबिर

**प्रतिनिधी । जामनेर**

**तालुक्यातील बेटावद बु येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून शेतकरी संघटनेच्या माध्यमातून हृदयरोग तपासणी शिबिर घेण्यात आले.**

यावेळी हृदयरोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, दमा व किडनीचे आजार या संदर्भातील रुग्णांच्या मनातील समज गैरसमज या विषयीचे मार्गदर्शन केले. तसेच डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज येथील हृदयरोग तज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून आलेल्या रुग्णांची मोफत तपासणी तसेच हृदयाचा २ डी इको, इसीजी, रक्तातील साखर इत्यादी तपासण्या करून मार्गदर्शन केले. शिबिरातील गरजू रुग्णांवर १९ जानेवारी २०२६ पासून शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. याप्रसंगी गुरुदास कन्हेरकर, दीपक कदम, सुभाष ठोंबरे, अमोल ढगे, अनिल मोझे, निलेश धनगर, मोहन भोईटे, नितीन मराठे, प्रकाश गाढे, गजानन गरुड, गजानन शिंदे, इकबाल पटेल, रामचंद्र अनफ ाट, रविंद्र भगत, गोपाल पाटील, गुरुदास कदम, विजय भोईटे, गजानन लवंगे, राजेंद्र दर्जी, दीपक कान्हे, ग्रामपंचायत कर्मचारी अक्षय नखोत यांनी शिबिरासाठी परिश्रम घेतले.